# ‘ज्ञानप्रकाश’ वृत्तपत्राचे हैद्राबाद मुक्तिसंग्रामात योगदान

**श्री. चंद्रभान वाळूबा मेंगाने**
संशोधक विद्यार्थी
इतिहास विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे **महाराष्ट्र भारत**

**‘ज्ञानप्रकाश’** या मराठी वृत्तपत्राची स्थापना कृष्णाजी त्रिंबक रानडे यांनी १२ फेब्रुवारी १८४९ रोजी पुण्यात केली.[१] दीर्घकाळ म्हणजे १०३ वर्ष चाललेले अनेक अवस्थांतरातून जाऊनही आपले स्थान महाराष्ट्राच्या जीवनात कायम टिकविणारे वृत्तपत्र म्हणून ’ ज्ञानप्रकाश’ ला विशेष महत्व आहे. अशा या शतायुषी वृत्तपत्राने हैद्राबाद मुक्तीसंग्रामात महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे.

ब्रिटीश राजवटीच्या काळात भारतात जवळपास ५६३ देशी राज्ये आणि संस्थाने होती. या राज्याच्या आणि संस्थानाचा राज्यकारभार देशी राजे व संस्थानिक पाहत असे. दक्षिण भारतात श्रावणकोर, बडोदा, कोल्हापूर ,नागपूर आणि हैद्राबाद ही पाच राज्ये होती. यामध्ये हैद्राबादचे राज्य आकाराने दुसऱ्या क्रमांकाचे होते. म्हणून ते महत्वाचे होते. मोगल सम्राट औरंगजेब २० फ्रेबुवारी १७०७ रोजी मरण पावला. त्याच्यानंतर सत्तेवर आलेले मोगल सम्राट दुर्बल व कतृत्वहीन निघाले याचाच फायदा घेवून दक्षिणेचा सुभेदार मीर कमरुद्दीन चिनकुलीज खान निजाम उल मुल्क याने ३१ जुलै १९२४ रोजी दक्षिणेस स्वतंत्र राज्याची स्थापना केली. या राज्याची हैद्राबाद राजधानी होती. या राज्याच्या गादीवर वंशपरंपरेने होऊन गेलेल्या सत्ताधिशांना ’निजाम’ व ’आसफजाह’ या नावाने ओळखले जात असे. हैद्राबाद राज्यात मराठवाडा, तेलंगण व कर्नाटक या प्रादेशिक विभागांचा समावेश होत असे.

१९४७ मध्ये ब्रिटीशांनी भारतीय स्वातंत्र्याचा कायदा पास केला. या कायद्यानुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत ब्रिटीशांच्या राजकीय वर्चस्वातून मुक्त झाला. म्हणजेच भारताला स्वातंत्र्य मिळाले.

वरील कायद्यानुसार देशी राज्ये आणि संस्थानिकांनाही आपले राज्य भारतात की पाकिस्तानात विलीन करावयाचे की आपले स्वतंत्र राहावयाचे याबाबतीत स्वातंत्र्य दिले होते.[२] त्यामुळे देशी राज्ये व संस्थाने भारतीय संघराज्यात कसे विलीन करुन घ्यायचे हा मोठा प्रश्न भारत सरकारपुढे निर्माण झाला. शेवटी भारताचे पंतप्रधान पंडीत नेहरु आणि गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी बहुतेक संस्थाने भारतात विलीन करुन घेतली. परंतु हैद्राबाद राज्याचा सत्ताधीश मीर उस्मान अली खान याने ११ जून १९४७ रोजी आपले राज्य स्वतंत्र राहणार असल्याचे जाहीर केले.[३]

निजामाने आपले राज्य स्वतंत्र राहणार असल्याचे घोषित केल्यामुळे भारत सरकार आणि हैद्राबाद राज्यातील जनतेपुढे मोठा पेच व प्रश्न निर्माण झाला. हैद्राबाद राज्याचा सत्ताधीश मुसलमान होता. परंतु राज्यात ७०% हिंदू , १८% दलित , ११% मुसलमान आणि १% इतर लोक होते. त्यातच निजामाची सत्ता अन्यायी, अत्याचाराची होती. याशिवाय देशाच्या व दख्खनच्या मध्यभागी असलेले आणि देशात आकाराने दुसऱ्या क्रमांकाचे असलेले हैद्राबाद राज्य स्वतंत्र राहणे जनतेच्या नव्हे तर देशाच्याही हिताचे नव्हते. तसेच हैद्राबाद राज्याच्या भारतातील विलीनीकरणाशिवाय भारताच्या स्वातंत्र्याला पुर्णत्व प्राप्त होणार नव्हते.[४] त्यामुळे राज्यातील जनतेने हैद्राबाद राज्याचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण करण्यासाठी सत्याग्रह व सशस्त्र आंदोलने केली. शेवटी १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारत लढयातले ' हैद्राबाद' राज्यावर लष्करी कारवाई करुन भारतीय संघ राज्यात विलीन करुन घेतले. हैद्राबाद राज्याच्या विलीनीकरणासाठी जनतेने जे सत्याग्रह व सशस्त्र आंदोलन केले हेच आंदोलन भारतीय इतिहासात ' हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम' या नावाने ओळखला जाते. या स्वातंत्र्य संग्रामात ' ज्ञानप्रकाश' वृत्तपत्राने देखील मोलाची कामगिरी केली आहे.

' ज्ञानप्रकाश' दि.६ जुलै १९३९ 'ज्ञानप्रकाश' वृत्तपत्राने ६ जुलै १९३९ च्या अंकात हैद्राबाद संस्थानातील हिंदूची करुन कहाणी. व 'हिंदू प्रजाजनांशी निजाम सरकारचे सापत्नभावाचे वर्तन सरकारी नोकऱ्यात हिंदूचे प्रमाण वाढविण्याची सूचना.' अशा आशयाची बातमी प्रसिध्द केली जाते.

जगत्गुरु श्री स्वामी शंकराचार्य ज्योतिर्मठ हे हैद्राबाद संस्थानातील वस्तुस्थिती पाहण्याकरीता हैद्राबादेस आले होते. त्यांचा मुक्काम येथे सुमारे दोन महिने होता. व त्या अवधीत त्यांनी संस्थानच्या निरनिराळया भागांना भेट देवून व प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली. संस्थानी अधिकारी त्यांच्या कामात सहाय्य करीत होते. येथून सोलापूरास जाताना स्वामिजींनी एक पत्रक प्रसिध्दीस दिले होते. या पत्रकात

स्वामिजी लिहतात.' हैद्राबाद राज्यातील हिंदू-प्रजाजनांची करुण-कहानी आम्ही ब्रिटीश हिंदुस्थानात बरेच दिवसांपासून ऐकत होतो. हिंदूचे जबरदस्तीने इस्लामीकरण केले जाते व या धर्मांतराला प्रत्यक्ष निजामसाहेबांचा व त्यांच्या इतर अधिकारी वर्गाचा पाठिंबा आहे. मुसलमान लोक स्वत:स राज्यकर्ते समजून कायदा व सुव्यवस्थेची सुत्रे आपल्याच सोयीप्रमाणे बदलत आहे. व हिंदूवर अनन्वित अत्याचार केले जातात. त्यांना देवळे, मंदिरे वगैरे बांधण्याची परवानगी मिळत नाही. पडलेल्या व पडत असलेल्या प्रार्थना मंदिरांची डागडुजी करता येत नाही. नित्यकर्म करण्यासाठी मज्जाव केला जातो. स्त्रियांची अब्रु सुरक्षित नाही.[५] हिंदूची देवळे नेहमी लुटली जातात. व मूर्तीचा भंग केला जातो. पुजा, किर्तने, दिंडया यांना सर्वस्वी मज्जाव आहे. आणि धार्मिक हक्काची पायमल्ली करणारे निरनिराळे सरकारी हुकूम काढण्यात आले आहेत. व त्यांची अंमलबजावणी कसोशीने केली जाते, असे आमच्या ऐकण्यात होते. सारांश हिंदूना हैद्राबाद संस्थानात जीवन दु:सह होते. प्रत्येक मूसलमान हिंदूशी राज्यकर्त्याच्या तोऱ्याने वागतो. व हिंदूला निमुटपणाने असली अरेरावी सहन करावी लागते. अशा बातम्या ऐकल्यामुळे आम्ही संस्थानातील परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्याचा निर्धार केला व सरकारनेही आमची मागणी मान्य केली.

आमच्या दौऱ्यात आम्ही १) हिंदूच्या देवालयांचे भ्रष्टीकरण २) धर्मांतर ३) कायदे व कानून आणि ४) सद्यस्थिती व परंपरा. या गोष्टीसंबंधी माहिती गोळा केली आहे. या चौकशीनंतर पूर्ण विचारांती आमचे असे ठाम मत झाले आहे की, हिंदूच्या देवस्थानची दुर्देशा त्यांच्या धार्मिक उदासिनतेमुळे नसून त्याला निजाम सरकारही तितकेच जबाबदार आहे. सरकार नेहमीच हिंदूना सापत्न भावाने वागविते. निरनिराळया अधिकाऱ्यांची हीच प्रवृत्ती आहे. हिंदूच्या धर्मांतरासही सरकार जबाबदार आहे. निरनिराळे गस्त्य (गस्ती) व कायदे हे सर्वधर्मीयांकरीता असले तरी त्यांची अंमलबजावणी मात्र हिंदूवरच अत्यंत कसोशीने केली जाते. हेंही तितकेच खरे आहे.

या अडचणींचे निराकरण करण्याकरीता स्वामीजींनी हैद्राबाद राज्यकर्त्यांना पुढील सूचना केल्या आहेत.

१) हैद्राबाद राज्यातील धार्मिक खात्याची हिंदू व मुसलमान यांच्याकरीता दोन स्वतंत्र खात्यात विभागणी करण्यात यावी. साऱ्या धर्मांतरीतांना या खात्यातून दाखले देण्यासंबंधी कायदा करण्यात यावा.

२) हिंदूच्या धार्मिक खात्यावर एका अनुभवी हिंदु – अधिकाऱ्यांची योजना करण्यात यावी व त्याला एक स्वतंत्र सल्लागार मंडळ असावे.

३) हिंदू मुसलमानांचे सण एकाच वेळा आल्यास त्या प्रसंगी हिंदुवर निर्बंधकारक असलेले सर्व कायदे रद्द करण्यात यावेत. सरकारने अशा प्रसंगी सर्व धर्मियांना पुर्ण स्वातंत्र्य द्यावे. शांतताभंग होतो म्हणून हिंदूवर निर्बंध लादणे अत्यंत अन्यायाचे आहे. सरकारला शांतता रक्षणार्थ योग्य खबरदारी घेतलीच पाहिजे.

४) किर्तने, प्रवचने व प्रवचनकार यांच्यावरील निर्बंध नाहीसे करण्यात यावे.

५) सरकारने कालमान परिस्थितीचा विचार करुन राज्यात योग्य सुधारणा अंमलात आणाव्यात.

६) हिंदू मुसलमानांचे जातीयवाद व दंगे यांच्या बिमोड करण्यासाठी सरकारने सरकारी नोकऱ्यांत हिंदूचे प्रमाण वाढवावे.[६]

पत्रकाच्या शेवटी स्वामिजींनी अधिकाऱ्यांच्या चांगुलपणावर बराच जोर दिला असून ते वरील सुधारणा अंमलात आणतील अशी आशा व्यक्त केले आहे.

ने.ना.अकबर हैदरी यांच्यासारखे प्रगतीशील पुढारी व सुसंस्कृत निजाम या सूचनांचा योग्य विचार करतील. अशी आशा व्यक्त करुन स्वामीजी पत्रकाच्या शेवटी लिहितात.

'जर आमच्या आशा यदाकदाचित निष्फळ होण्याचा योग आला (परमेश्वर तसें न करो) तर आम्ही सर्व शक्तिमान प्रभूच्या आदेशाप्रमाणे वागू.' असा इशाराही स्वामींनी दिला असे. 'ज्ञानप्रकाश' म्हणतो.

'ज्ञानप्रकाश' वृत्तपत्राने शनिवार ता. २ जुलै १९३८ रोजी निजामी न्यायनिती नि राजनिती.' अशा आशयाचा अग्रलेख प्रसिध्द केला त्यात निजामांच्या हैद्राबाद संस्थानात प्रजाजनांना नागरिकत्वाचे मुलभूत स्वातंत्र्याचे हक्क नाहीत ही गोष्ट यापूर्वी अनेकदा जगजाहीर झालेली आहेत. पण त्या गोष्टीची लोकांना पुन:पुन: आठवण करुन देऊन, त्यांना आपल्या राजकीय हीनतेचे स्मरण करुन देण्याजोग्या गोष्टी वरचेवर करण्याला निमाजांचा अधिकारी वर्ग मुळीच मागे पुढे पहात नाही, नि त्यामुळे वृत्तपत्रांनाही या विषयावर वरचेवर लेखणी चालविण्याचा प्रसंग यावा हेही अपरिहार्यच आहे. निजामांच्या राज्यात सभाबंदी, भाषणबंदी, मुद्रणनियंत्रण इत्यादी मार्गांनी प्रजाननांच्या नागरिकत्वाचा मूलभूत हक्कांची परमावधीचा संकोच कसा केला गेला आहे, यांचे उत्कृष्ट प्रत्यंतर काही आठवडयापूर्वी निजामांच्या राज्यांतील मराठवाडा भागात लातूर येथे बॅ.श्रीनिवासराव शर्मा यांच्या अध्यक्षत्वाखाली भरलेल्या परिषदेच्या अधिवेशनाच्या वेळी स्थानिक

अधिकारी वर्गाने केलेल्या अरेरावीच्या प्रकारांवरुन जनतेला कळून चुकलेच आहे. इतरही अनेक प्रसंगी निजामांच्या अधिकारी वर्गाने निजामांच्या प्रजाजनांच्या मुलभूत स्वातंत्र्याच्या हक्कावर अशाच प्रकारची गदा आणलेली होती. पण प्रथम–प्रथम निमाजांच्या प्रजेने त्याकडे दुर्लक्षही केलेले होते. असे म्हणा, अथवा ते अन्याय निमूटपणे सहन करणे हेच निजामांच्या प्रजेला मुत्सद्देगिरीचे नि आवश्यक वाटले म्हणून म्हणा, काही वर्षापूर्वी निमाजांच्या अधिकारी वर्गाकडून केला जाणारा प्रजाजनांच्या नागरिकत्वाच्या मूलभूत स्वातंत्र्य हक्कावरील हल्ला प्रजाजनांमध्ये विशेष गवगवा होण्याला कारणीभूत होत नसे, ही गोष्ट मात्र खरी आहे. पण प्रजाजनांवर त्या मुकवृत्तीचा परिणाम असा झाला की , निमाजांच्या अधिकारी वर्गाला प्रजेच्या हक्कावरील आक्रमण हीच मोठी राजनिती वाटू लागली, नि ते जनतेला असे भासवू लागले की, मुद्रण नियंत्रण, सभा नियंत्रण ,भाषण प्रतिबंध इत्यादी प्रकारचे दडपशाहीचे नि नागरिक हक्क संकोचक हुकूम आणि फतवे नि फर्माने हे सर्व प्रजाहितासाठीच जन्म पावलेले आहे. निजामांच्या अधिकारी वर्गाचा तो युक्तिवाद निजामांच्या भोळया नि मागासलेल्या प्रजेलाही पटणे शक्यच नव्हते. तथापि निजामांच्या प्रजेमध्ये त्यावेळी आतासारखी राजकीय हक्काविषयीची जागृती झालेली नसल्यामुळे म्हणा, अथवा साम्राज्यसरकारच्या भीतीमुळे म्हणा, निजामाच्या प्रजाजनांनी अधिकारी वर्गांचे अयोग्य हुकूमही राजनिष्ठपणे पाळलेले आहेत, नि त्यास प्रत्यक्ष प्रतिकार अथवा सनदशीर विरोधही क्वचितच केला असेल. निजाम सरकारची राजनीति अत्यंत प्रतिगामी स्वरुपाची होण्याला प्रजाजनांची ही मूकवृत्ती , नि हे राजकीय शैथिल्य विशेष कारणीभूत झालेले आहे. तसेच निजामांच्या सर्वसाधारण राजकीय धोरणातील इस्लाम धर्मविषयक पक्षपाती पुरस्कार हाही निजामांच्या हिंदू–प्रजेला मुखदुर्बल करण्याला कारणीभूत झालेला होता.[७]

अशा रितीने निजामांची राजनिती ही प्रतिगामी स्वरुपाची आणि काही बाबतीत हिंदू–मुसलमानांमध्ये विषमता उत्पन्न करणारी झालेली होतीच. आतापावेतो पुष्कळांची अशी प्रामाणित समजुत होती, की, न्यायदानाच्या बाबतीत तरी निजामांचा अधिकारी वर्ग उदारपणाचे धोरण स्वीकारावयास नाखूष नसतो. उदा. निजामांनी आपल्या राज्यांतून काही वकिलांना राजकीय हेतूने हद्दपार केलेले असले ,तरी निजामांच्या राज्यातील न्यायसनापुढे चौकशीसाठी येणाऱ्या खटल्यांत निजामांच्या राज्याबाहेरच्या वकिलांना आरोपींच्या बचावाच्या कामासाठी येऊ देण्याला निजाम सरकारचा अधिकारी वर्ग प्रतिबंध करीत नसे. नि अशा रीतीने

आरोपीला निदान आपणाकडून आपण बचावाची व्यवस्था कार्यक्षमपणे केली असे समाधान माणण्याला जागा होई. परंतु आता निजामांच्या राजनितीप्रमाणे त्यांच्या न्यायनितीतही प्रतिगामी स्वरुपाची क्रांती होऊ लागलेली दिसते. ही अत्यंत खेदाची नि निषेधार्ह गोष्ट होय. विशेषत: काही महिन्यांपूर्वी हैद्राबादेत झालेल्या हिंदू–मुसलमानांच्या दंग्या– संबंधाच्या खटल्याच्या बाबतीत हिंदु आरोपींनी संस्थानाबाहेरच्या वकिलाची मागणी केली, असताना , निजाम सरकारने आपल्या न्यायनितीच्या धोरणांत राजनितीच्या प्रतिगामी तत्वांची घुसडा–घुसड करुन २३ हिंदू आरोपींना स्वनियोजित वकिल नि कायदेपंडीत यांचे सहाय्य संपादन करण्याला प्रतिबंध होईल असे फर्मान काढावे, ही गोष्ट अत्यंत अनुचित आणि अन्यायाची झालेली आहे.[८]

हैद्राबाद हिंदू मुसलमान दंग्याच्या खटल्यातील २३ आरोपींनी मुंबईचे सुप्रसिध्द काँग्रेसभक्त आणि लोक धुरीण श्री.के.एफ.नरीमन यांना आपल्यातर्फे वकिलपत्र देण्याचे सहज योजिले होते. पण निजामांनी श्री.नरिमन यांना हैद्राबाद संस्थानात प्रवेशबंदी करण्यात निजामांनी आपली प्रतिगामी राजनिती पुन्हा एकदा ढळढळीत रीतीने व्यक्त केलेली आहेच, पण त्याच समवेत, त्यांनी आपल्या न्यायनितीचाही काटा अयोग्य दिशेला झुकण्याला पोषक अशा धोरणाला पाठिंबा दिला आहे, ही अत्यंत खेदाची गोष्ट होय. वस्तुत: श्री नरीमन यांना संस्थान प्रवेशबंदी करणे हेच अन्यायाचे नि बेसनदशीर झाले आहे. पण त्याहीपेक्षा कोर्टातील आरोपींना त्यांच्या विश्वासातील लायक वकिल उपलब्ध करुन देण्याला अडथळा करणे हे अधिक आक्षेपार्ह आहे. अशा रीतीने आपली राजनिती नि न्यायनिती ही दोन्ही टीकास्पद करण्याला निजामांनी स्वत:च्या कृतीने बुध्दीपरस्पर कारणीभूत व्हावे, ही गोष्ट निजामांच्या एकंदर राज्यपध्दतीत संपूर्णपणे सनदशीर नि कायदेशीरच मार्गाने पण आमुलाग्र सुधारणा करणे हे आता लोकहितदृष्टया किती आवश्यक झालेले आहे याची चांगली निदर्शक आहे. श्री. नरीमन यांनी म्हैसुरांत कायदेभंग केला या भीतीने निजामांच्या अधिकाऱ्यांनी त्यांना प्रतिबंध केला, असे म्हटले जाईल. पण डॉ. पट्टाभिसितारामय्या यांच्यासारख्या प्रतिगामी मानण्यांत येणाऱ्या अनत्याचारी आंध्र पुढाऱ्यांवरही हैद्राबाद संस्थानात प्रवेश बंदीचे फर्मान का सोडण्यात यावे, याचा काही सयुंक्तिक खुलासा ने.ना.सर अकबर हैदरी हे करु शकतील काय ? आता हैद्राबाद दंगा खटल्यातील हिंदू आरोपींच्या बचावासाठी काँग्रेस वर्किंग कमिटीचे सभासद श्री.भुलाभाई देसाई यांना कायदे पंडीत म्हणून नेण्यांत येणार आहे असे समजते. ही निवड चांगली आहे

पण, श्री.नरिमन नि. डॉ. पट्टाभिसितारामय्या या दोघांविरुध्द निजामांनी सोडलेल्या संस्थान प्रवेश बंदीचा निषेध काँग्रेस वर्किंग कमिटीने करावयास नको काय ? निजाम सरकारच्या या दडपशाहीच्या फर्मानामुळे ब्रिटीश हिंदुस्थानातील लोकमत खरोखरच फार असंतुष्ट नि प्रक्षुब्ध होत चालले आहे, हे लक्षात घेऊन, निजामांची राजनिती नि न्यायनिती यांत इष्ट सुधारणा त्वरीत घडवून आणण्याचा प्रयत्न ने.ना.सर अकबर हैदरी यांच्यासारख्या बुध्दू अमात्याने नि मुत्सध्याने तरी त्वरीत केला पाहिजे [९]

निष्कर्ष :

१) ' ज्ञानप्रकाश' वृत्तपत्राने हैद्राबाद मुक्तीसंग्रामात महत्वपूर्ण योगदान दिले आहे.

२) हे योगदान देत असताना ' ज्ञानप्रकाश' ने निजामाच्या अन्याय धार्मिक धोरणाची परखड चिकित्सा केली आहे.

३) 'ज्ञानप्रकाश' ने हैद्राबाद मुक्तीसंग्रामास प्रेरणा देऊन देशाच्या अखंडत्वासाठी व एकात्मतेसाठी प्रयत्न केले.

४) ' ज्ञानप्रकाश' वृत्तपत्राने हैद्राबाद संस्थानातील प्रजेत जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

५) ' ज्ञानप्रकाश ' ने हैद्राबाद मुक्ती संग्रामातील बातम्या लोकांपर्यंत पोहचवल्या व राष्ट्रीय वृत्ती जोपासली.

६) ' ज्ञानप्रकाश ' ने वृत्तपत्र स्वातंत्र्याचे भान ठेवले.

७) हिंदूवर होणाऱ्या धार्मिक अत्याचाराची दखल ' ज्ञानप्रकाश' ने घेतली आहे.

## संदर्भ व टिपा:

१) *रा.के.लेले, मराठी वृत्तपत्रांचा इतिहास*, पुणे, द्वितीयावृत्ती, २००४, पृ.९५.

२) *डॉ.गायकवाड नरेंद्र, मराठवाडयातील दलित चळवळ आणि हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम,* पुणे, १९९०.

३) कित्ता पृ.४.

४) कित्ता पृ.१०.

५) *'ज्ञानप्रकाश'*, पुणे, ३ जुलै १९३९, पृ.६.(बातमी)

६) कित्ता पृ.६.

७) कित्ता पृ.६.

८) *'ज्ञानप्रकाश'*, पुणे, २ जुलै १९३८, पृ.४.(अग्रलेख)

९) कित्ता पृ.४.